माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /तक्रार ५८ /२०२२ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विक्रम बाबासाहेब गायकवाड | सहाय्यक संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे - ०१ | शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे - ०१ |

<u>तक्रार सुनावणी दिनांक -दि.१३/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. ०४/०४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ४३२१+४३२२+४३२३/२०१७/पुणे मध्ये सुनावणी घेऊन दि.२३/०८/२०२१ रोजी आदेश पारित केले.

त्यामध्ये १) आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक, शिक्षण उपसंचालक, भूमि विभाग तसेच प्रा.शास्त्र सल्लागार, शिक्षण उपसंचालक, कार्यालय, पुणे यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही.

२) तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत काहीही कार्यवाही न करुन अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई करणेत येवू नये याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा त्यांचेविरुध्द कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम-१९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/ ०७/६(मा.अ) दि.१२/१२/२००७ व परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/३/२००८ मधील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

अशी तक्रार तक्रारदार यांनी केली आहे."

त्यामध्ये दि. १४/१२/२०२३ रोजी सुनावणी आयोजित केली असता अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सदर सुनावणीचे दिवशी तक्रारदार यांनी सूचीत केले की, माहिती मिळाली नाही.

सुनावणीचे वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे श्री.जयंत कुलकर्णी यांनी आयोगास सूचित केले की, आयोगाचे आदेशाचे वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, मीना शेंडकर (सध्या कोल्हापूर शिक्षण अधिकारी, प्राथमिक) हया होत्या तर शास्त्र सल्लागार श्रीमती संगीता शिंदे (सध्या नाशिकला कार्यरत) हया होत्या. सदर आदेशाची प्रत शिक्षण आयुक्त, म.रा.पुणे यांनाही दिली होती.

सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, सदर आदेशाची प्रत शिक्षण आयुक्त, म.रा.पुणे यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तथापि त्यांनी काही कारवाई केली नाही.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१. शिक्षण आयुक्त, म.रा.पुणे यांना आदेशित करण्यांत येते की, पुढील सुनावणीचे वेळी आयोगाच्या आदेशानंतर संबंधित अधिकारी यांनी आजपर्यंत काय कार्यवाही केली, त्याबाबतचा लेखी खुलासा आयोग आदेश प्राप्तीपासून १५ दिवसांच आत आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील योग्य ती कारवाई करण्यांत येईल याची दक्षता घ्यावी.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार क्रमांक ५८/२०२२/पुणे / 5146/2023 दिनांक 13/12/2023